**—: प्रेसनोट :—** दिनांक : ०३/०३/२०२२

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.नों.क्र. | ११/२०२२ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालयाचा पत्ताा. | श्री. देविदास ज्ञानदेव कवडे, वय— ५६ वर्षे, व्यवसाय— सहकार अधिकारी, वर्ग— ३, उप— निबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर— नॉर्थ विभाग, कांदिवली, मुंबई, |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. ४०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. २०,०००/— |
| हस्तगत केलेली रक्कम | रु. २०,०००/— |
| थोडक्यात हकिकत | यातील फिर्यादी राहत असलेली अॅमेझॉन को. ऑ. हौ. सोसायटी, बोरीवली, मुंबई मधील पदाधिकारी यांनी केलेल्या गैरकारभाराबाबत फिर्यादी यांच्या पत्नीने उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालय, आर उत्तर विभाग, कांदिवली (पुर्व), मुंबई येथे तक्रारअर्ज केला होता. सदर तक्रारअर्ज पुढील कार्यवाहीसाठी आरोपी लोकसेवक देविदास कवडे यांच्याकडे प्रलंबित होता. सदर तक्रार अर्जावर कारवाई करण्यासाठी आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे लाच म्हणुन प्रथम रुपये ५०,०००/— ची मागणी केली होती. परंतु फिर्यादी यांनी लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयास लोकसेवकाविरूध्द दिनांक २८/०२/२०२२ रोजी लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०२/०३/२०२२ रोजी पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान लोकसेवकाने रू.५०,०००/— लाचेची मागणी केली व तडजोडीअंती रुपये ४०,०००/— घेण्याचे मान्य केले. त्यानंतर दि. ०३/०३/२०२२ रोजीच्या केलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवक श्री. देविदास कवडे यांनी फिर्यादी यांचेकडुन लाचेच्या रकमेचा पहीला हप्ता रू.२०,०००/— स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net